| | |
|---|---|
| **CNR No. MHND270000622025** | **संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१५/२०२५** |
| | **सरकार विरुध्द गोपी राठोड** |
| | **महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) प्रमाणे** |
| | **निशाणी क्र.०८ खाली** |

## ( न्यायनिर्णय )

## (दिनांकः ०५.०६.२०२६ रोजी घोषीत केला)

**१.** सरकारी पक्षातर्फे विधीज्ञ श्री.एस.बी.पवार व आरोपी तर्फे विधिज्ञ श्री. बी.एस.निखाते यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

**२.** दोन्ही विधिज्ञांचा युक्तीवाद श्रवणोपरांत खालील मुद्दे विचारार्थ निर्माण झाली. ज्याची उत्तरे त्या खाली कारणमिमांसेत्सव देण्यात आली.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | सरकारपक्षाने असे सिध्द केलेले आहे काय की, दि. १९.०५.२०२४ रोजी अवैध धंद्यावरील केसेस करण्यासाठी निघाले असतांना मौजे चिकाळातांडा येथे असतांना मिळालेल्या गुप्त बातमीवरुन आरोपीचे शेतामध्ये छापा मारला असता तिथे आरोपीचे ताब्यामध्ये अवैधरित्या विनापरवाना ३० लीटरचे तीन कॅनमध्ये अंदाजे गावठी दारु ७० लीटर ७,०००/- रुपयाचा मुद्देमाल बेकायदेशीररित्या बाळगून मिळून आला? | **नाही.** |
| २) | अंतिम आदेश ? | **अंतिम आदेशा प्रमाणे** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ करीता:–**

३.            अभियोगपक्षाने विजयकुमार प्रल्हादकुमार आलेवार (सा.क्र.१) यांची साक्ष नोंदविली. वेळोवेळी संधी देवुनही अभियोगपक्षाने इतर साक्षीदारांना तपासलेले नाही, त्यामुळे त्यांचा पुरावा बंद करण्यात आला. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) प्रमाणे आरोपीचे निवेदन नोंदविण्यात आले.

४.            अभियोगपक्षाला सदर प्रकरणी हे शाबीत करणे गरजेचे आहे की, आरोपी हा त्याच्या ताब्यामध्ये अवैधरित्या हातभट्टी दारू बाळगून मिळून आली. सदरची बाब शाबीत करण्याकरीता जप्ती पंचनामा अभियोगपक्षाला काटेकोरपणे शाबीत करावा लागेल.

५.            आलेवार (सा.क्र.१) यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये सांगितले आहे की, दिनांक १९.०५.२०२४ रोजी अवैध धंद्यावरील केसेस करण्यासाठी निघाले असतांना मौजे चिकाळातांडा येथे असतांना मिळालेल्या गुप्त बातमीवरुन आरोपीचे अंगणामध्ये छापा मारला असता तिथे आरोपीचे ताब्यामध्ये अवैधरित्या विनापरवाना ३० लीटरचे तीन कॅनमध्ये गावठी दारु ७० लीटर अंदाजे ७,०००/– रुपयाचा मुद्देमाल बाळगून मिळून आला.   त्यानंतर त्यांनी स्वतः फिर्याद व जप्ती पंचनामा केला.  परंतु, उलटतपासणीमध्ये असे आलेले आहे की, त्यांनी त्यांची वैयक्तीक अंगझडती दिली नाही व अंगझडतीचा वेगळा पंचनामा केला नाही व ज्या जागेवरुन मुद्देमाल मिळाला ती जागा कोणाच्या मालकीची आहे याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर नाही आणि कायद्याप्रमाणे जी कार्यवाही होती ती केली गेली नाही आणि जप्त केलेल्या बॉटलची माहिती त्याच्याबद्दलचा क्रमांक रेकॉर्डवर दाखल करण्यात आला नाही. गुन्ह्यात जप्त मुद्देमाल नमुना रासायनिक प्रयोगशाळेच्या अहवालासाठी पाठवण्यात आल्याचे व नमुनावाहक यांचा उल्लेख अभिलेखावर

घेतल्याचे दिसून येते. किती वेळात जप्त मुद्देमालचा नमुना पाठवण्यात आला त्याचा उल्लेख आलेला आहे. ज्यावरून आरोपीकडून तथाकथीत घटनेच्या दिवशी दारू पकडली होती, ही बाब शाबीत होत नाही. करिता मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करीता:–</u>**

**६.** मुद्दा क्र.१ चे नकारार्थी निष्कर्षावरुन आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. प्रकरण हातावेगळे करण्यापुर्वी मुद्येमालाच्या विल्हेवाटी बाबत नमूद करणे आवश्यक आहे. जप्त करण्यात आलेला मुद्देमाल मोक्यावर नाश केल्याचे अभिलेखावरुन दिसुन येते, त्यामुळे मुद्देमालाबाबत आदेश नाही. करिता, मुद्दा क्र.२ वर खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१ आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१) अन्वये मुंबई मद्य निषेध कायद्याचे कलम ६५(ई) अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केल्याचे आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२ आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येत असून त्याच्या जामीनदाराला त्यांनी दिलेल्या जामीनातून मुक्त करण्यात येत आहे.

३ आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ च्या प्रयोजनार्थ रु.५,०००/– चा बंधपत्र द्यावे.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.

सही/–

ठिकाण: मुदखेड

**( श्रीमती शितल पी. कौल)**

दिनांक: ०५.०६.२०२६

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, मुदखेड,

जि. नांदेड

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File judgment are same word to word, as per the original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the stenographer | : | --- |
| Court Name | : | J.M.F.C. Mudkhed |
| Date | : | 05-06-2026 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 05-06-2026 |
| Judgment Uploaded on | : | 05-06-2026 |